**<u>नियमित फौजदारी खटला क्रमांक १९२/२०२१</u>**

**<u>निशाणी क्रमांक :–</u>**

# <u>दोषारोपपत्र</u>

**मी, एस. एन. थापेकर, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कर्जत, तुमच्यावर दोषारोपपत्र ठेवत आहे की,**

१. **जालींदर महादेव चव्हाण,**
वय–७३ वर्षे, व्यवसाय– शेती,

२. **रेवननाथ जालींदर चव्हाण,**
वय–३५ वर्षे, व्यवसाय– शेती,

३. **दत्ता उर्फ दत्तात्रय जालींदर चव्हाण,**
वय–३७ वर्षे, व्यवसाय– शेती,
सर्व रा. कोरेगाव,
ता.कर्जत, जि.अहमदनगर.

तुम्ही दिनांक २६.०४.२०२० रोजी दुपारी ०१.०० वाजेच्या सुमारास मौजे मुरकुटेवस्ती, कोरेगाव, ता.कर्जत, जि. अहमदनगर येथे तक्रारदार नामे बिभीषण रंगनाथ हावळे त्याच्या शेताच्या जवळ रस्त्याच्या कडेला दगड उचलण्याचे काम करीत असताना तुम्ही आपसात संगनमत करुन तक्रारदार व संतोष हावळे याने शिवाजी चव्हाण याचे शेत विकत घेतल्याच्या कारणावरुन तक्रारदार यास शारीरिक ईजा पोहचविण्याच्या तुमच्या सामाईक हेतूच्या पुर्ततेकरीता तुमचेपैकी आरोपी क्र.२ रेवननाथ चव्हाण याने त्याच्या हातातील लोखंडी पहारीने तक्रारदाराच्या डोक्यात मारुन व आरोपी क्र.१ जालींदर चव्हाण याने काठीने तक्रारदाराच्या पाठीत, पायावर व मांडीवर मारुन त्याला घातक

साधनांनी इच्छापुर्वक शारीरिक दुखापती केल्या व त्यायोगे तुम्ही भारतीय दंड विधान कलम ३२४ सह कलम ३४ अन्वये शिक्षापात्र असलेला आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा अपराध केला आहे.

दुसरे– वर नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही आपसांत संगनमत करुन तुमच्या सामाईक हेतूच्या पुर्ततेकरीता तुमच्यापैकी आरोपी क्र.३ दत्ता उर्फ दत्तात्रय चव्हाण याने तक्रारदार नामे बिभीषण हावळे याला खाली जमीनीवर पाडुन लाथाबुक्यांनी मारहाण करुन इच्छापुर्वक शारीरिक दुखापत केली व त्यायोगे तुम्ही भारतीय दंड विधान कलम ३२३ सह कलम ३४ अन्वये शिक्षापात्र असलेला आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा अपराध केला आहे.

तिसरे– वर नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही आपसांत संगनमत करुन तुमच्या सामाईक हेतूच्या पुर्ततेकरीता तुम्ही तक्रारदारास शिवीगाळ करुन अपमानित केले जेणेकरुन तक्रारदाराकडुन सार्वजनिक शांततेचा भंग होईल अथवा अपराध घडेल असे जाणीपूर्वक कृत्य करुन तुम्ही भारतीय दंड विधान कलम ५०४ सह कलम ३४ अन्वये शिक्षापात्र असलेला आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा अपराध केला आहे.

चौथे– वर नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही आपसांत संगनमत करुन तुमच्या सामाईक हेतूच्या पुर्ततेकरीता तुम्ही तक्रारदारास तू पुन्हा जर शेतात दिसला तर जिवे ठार मारुन टाकू तसेच आमच्या नादी लागू नका अशी धमकी देऊन फौजदारी पात्र धाकदपटशा दाखविला व त्यायोगे तुम्ही भारतीय दंड विधान कलम ५०६ सह कलम ३४ अन्वये शिक्षापात्र असलेला आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा अपराध केला आहे.

आणि मी याद्वारे असा निर्देश देतो की, उक्त दोषारोपाबद्दल तुमची या न्यायालयाद्वारे संपरीक्षा करण्यात यावी.

SHIVAJI N THAPEKAR Digitally signed by SHIVAJI N THAPEKAR Date: 2026.01.20 13:39:45 +0530

दिनांक: २०.०१.२०२६ **(एस. एन. थापेकर)**

ठिकाण: कर्जत न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, न्यायालय क्र.१

कर्जत.

## <u>प्रमाणपत्र</u>

दोषारोप मधील मजकुर आरोपींना मराठीमध्ये वाचून व समजावून सांगितला. आरोपींचे निवेदन स्वतंत्रपणे नोंदविले आहे.

SHIVAJI N THAPEKAR Digitally signed by SHIVAJI N THAPEKAR Date: 2026.01.20 13:39:57 +0530

दिनांक: २०.०१.२०२६ **(एस. एन. थापेकर)**

ठिकाण: कर्जत न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, न्यायालय क्र.१

कर्जत.